जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव

म.जा.क./काव्यवि/वि.शा./6130 /२०२५ दिनांक: 06/11/२०२५

प रि प त्र क

जळगांव न्यायीक जिल्हयातील सर्व आस्थापनांवरील कर्मचारी यांना दरमहाचे मासिक वेतन, सण अग्रीम, वैद्यकीय प्रतिपुर्ती देयक, बदली प्रवास भत्ता देयक, प्रवास भत्ता देयक, रजा प्रवास सवलत देयक, स्वग्राम देयक, वाहन चालक यांचा अतिकालीक भत्ता व इतर देयके वेळोवेळी अदा करण्यात येत असतात. उपरोक्त विविध देयके तयार करण्याकामी शासनाकडील सेवार्थ प्रणाली ही मासिक वेतन अदा करणेकामी व बिल पोर्टल प्रणाली ही उर्वरीत इतर देयकांकामी वापरण्यात येत असते. नमुद दोन्हीही प्रणाली या स्वतंत्र असल्याने कर्मचा–यांची बॅक तपशिलाची नोंदणी दोन्ही प्रणालींवर करणे अनिवार्य असते. याकामी सर्व कर्मचारी यांचेकडून बॅक तपशिलाची माहिती गोळा करुन त्यांनी पुरविलेल्या माहितीच्या आधारे तसा बॅकेचा तपशिल संबंधित प्रणालींवर संबंधित कार्यालयांकडून यापुर्वीच नोंदविलेला आहे.

तथापि माझे असे निदर्शनास आले आहे की, बरेचसे कर्मचारी यांनी पुर्वी दिलेल्या बॅकेच्या तपशिलामध्ये कालांतराने बदल केलेला आहे. जसे की, शाखा बदल करणे, बॅक बदल करणे, नावात बदल करणे इ. असे परस्पर बदल करुन, कार्यालयास याबाबत अवगत करीत नाही. सदरील बदलाबाबतीत कार्यालयास अवगत केल्यास कार्यालयातील संबंधिताकडून त्याबाबत फक्त सेवार्थ प्रणालीमध्येच नोंदणी अद्ययावत करण्यात येत असते. परिणामी बिल पोर्टल प्रणालीवरील नोंदणी अद्ययावत नसल्याने अथवा बिल पोर्टल प्रणालीवर पुर्वीच नोंदणी केलेला बॅकेचा तपशिल कार्यान्वित नसल्याने बिल पोर्टल प्रणालीवरील देयके पारीत करुन अदा करणेस तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. त्याचप्रमाणे असे देखील निदर्शनास आले आहे की, काही कर्मचारी यांचे सेवार्थ प्रणालीतील मासिक वेतनाकामी व बिल पोर्टलद्वारे अदा करण्यात येणा–या इतर देयकांकामी दोन स्वतंत्र बॅक खात्यांचा तपशिल अदाता नोंदणी म्हणून नोंदविलेला आहे. असे असतांना बिल पोर्टल कामी पुरविण्यात आलेला बॅक खात्याचा तपशिल कार्यान्वित आहे किंवा कसे याबाबत संबंधित कर्मचा–यांकडून वेळोवेळी कार्यालयास अवगत करीत नसल्याने देखील देयके पारीत करुन अदा करणेस गैरसोईचे होत आहे. या सर्व परिणामांमुळे देयके पारीत करुन संबंधित कर्मचा–यास अदा करणेस कार्यालयास वारंवार तांत्रिक अडचणीस सामोरे जावे लागत असून कार्यालयीन कामकाजाचा बराच वेळ सदरील बाबींचा निपटारा करण्यात विनाकारण व्यर्थ होत आहे.

सबब याद्वारे जळगांव न्यायीक जिल्हयातील सर्व आस्थापनांवरील कर्मचारी यांना निदेर्शित करण्यात येते की, कर्मचारी यांनी कार्यालयास यापुर्वीच कळविलेल्या बॅक खात्याच्या तपशिलात कोणताही बदल केला असल्यास त्याबाबतचा बदल सेवार्थ प्रणालीत तसेच बिल पोर्टलवर अद्ययावत करणेकामी त्वरीत संबंधित आस्थापनेस लेखी स्वरुपात कळवावे तसेच भविष्यात अंसा कोणताही बदल करावयाचा असल्यास त्याबाबत संबंधित आस्थापनेस लेखी स्वरुपात पुर्व सुचित करावे.

वरिल परिस्थितीच्या अनुषंगाने सर्व आस्थापनेवरील सर्व देयके तयार करणारे सर्व संबंधित कर्मचारी यांना निर्देशित करण्यात येते की, सद्यस्थितीत सर्व कर्मचारी यांचे सेवार्थ प्रणालीत व बिल पोर्टल प्रणालीवर अदाता नोंदणी म्हणून असलेला बॅक खात्याचा तपशिल अचुक, बरोबर व कार्यान्वित असल्याबाबत सर्व संबंधित कर्मचारी यांचेकडून त्याबाबतचे हमीपत्र घेण्यात यावे. तसेच ज्या कर्मचा–यांकडून पुर्वी नोंदणी केलेल्या बॅक खात्याचे तपशिलात बदल केला असेल त्याबाबत संबंधिताकडून लेखी स्वरुपात माहिती घेवून त्याअनुषंगाने बॅक खात्याचा तपशिल सेवार्थ प्रणालीवर व बिल पोर्टलवर तात्काळ अद्ययावत करण्यात यावा व भविष्यात देखील अश्या स्वरुपाच्या बदलाबाबत संबंधित कर्मचा–याने सुचित केल्यास त्याबाबतची कार्यवाही देखील संबंधित कार्यालयाने तात्काळ वेळचेवेळीच करावी. त्याचप्रमाणे कर्मचा–यांची एका आस्थापनेवरुन दुस–या आस्थापनेवर बदली झाल्यास अथवा आस्थापना बदलल्यास अश्या कर्मचा–यांची सेवार्थ व बिल पोर्टल

..२/–

संदर्भातील अदाता नोंदणी तात्काळ संबंधित कार्यालयास वर्ग करण्यात यावी. सर्व कर्मचा–यांची सेवार्थ प्रणालीतील व बिल पोर्टलवरील बॅंक खात्याचा तपशिल अचुक, बरोबर व कार्यान्वित असल्याबाबतची खात्री करणेचे अनुषंगाने आस्थापनेवरील सर्व कर्मचा–यांस प्रत्येक वर्षाचे ऑगष्ट महिन्यात अवगत करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

येणेप्रमाणे विषयांकीतकामी परिपत्रकाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यांत यावी व सदरील परिपत्रक जळगांव न्यायिक जिल्ह्यातील सर्व कर्मचा–यांस निदर्शनास आणून देण्यात यावे. परिपत्रकाचे अनुषंगाने अंमलबज़ावणी न केल्यास अथवा भविष्यात वरील बाबीच्या अनुषंगाने वेळचेवेळी पुर्तता न केलेबाबत निदर्शनास आल्यास संबंधित कर्मचारी तसेच सर्व संबंधितांस जबाबदार धरण्यात येईल.

सही/-
६-११-२०२५

जिल्हा व सत्र न्यायाधीश,
तथा नियंत्रक अधिकारी,
जळगांव.

प्रत माहितीकरीता व पुढील कार्यवाहीसाठी रवाना:

१) म.जिल्हा न्यायाधीश–१ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, जळगांव / (२) अमळनेर / (३) भुसावळ
४) म.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, जळगांव /(५) अमळनेर / (६) भुसावळ /(७) चाळीसगांव
८) म.मुख्य न्यायदंडाधिकारी, जळगांव.
९) म.दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, बोदवड / (१०)भडगांव / (११) चोपडा / (१२) धरणगांव/ (१३) एरंडोल/ (१४) जामनेर/ (१५) मुक्ताईनगर/ (१६) पाचोरा/ (१७)पारोळा/ (१८)रावेर/ (१९)यावल.
२०) म.सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, भुसावळ / (२१) चाळीसगांव.
२२) म.न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, पहिले न्यायालय, जळगांव.
२३) म.न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, दुसरे न्यायालय, जळगांव.
२४) म.न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, अमळनेर.
२५) म.न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, लोहमार्ग न्यायालय, भुसावळ.

प्रत माहितीकरीता व पुढील कार्यवाहीसाठी:

२६) प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव.
२७) अधिक्षक, कार्य व्यवस्थापन विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव.
२८) सहाय्यक अधिक्षक, आस्थापना शाखा/वित्त शाखा, जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव
२९) सहाय्यक अधिक्षक (नाझर), रोख शाखा, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव.

/– यांना असे सुचित करण्यात येते की, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव चे आस्थापनेवरील सर्व कर्मचा–यांस सदरील परिपत्रक निदर्शनास आणून देण्यात यावे.

VJKamkar

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
जळगांव.